●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक ११४ ●गुरूवार, दि. २४ जुलै २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये
● Beed (Maharashtra) ● Year 5 ●Issue 114 ● Thursday, 24 July 2025 ● RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ● Page 1 ● Pages 4 ●Price 3 Rs.

asianpaints
रूद्र कलर होम
आमच्याकडे सर्व प्रकारचे
वॉटर कलर, सिमेंट कलर मिळतील.
प्रो.प्रा. योगेश वाघीरे
९१४६७०२३२३
८१४९८०००२०
-: पत्ता : -
राष्ट्रवादी भवनसमोर,
बार्शी रोड, बीड.

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

श्री.गंगाभारती कृपा
मो.7038389999
आदित्य
फर्निचर मॉल
छत्रपती संभाजी महाराज चौक,बार्शी रोड,बीड

बीड ● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# भारतातील सर्वाधिक भ्रष्ट १० विभागांची खळबळजनक यादी समोर



**मुंबई । प्रतिनिधी**

भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर देशात अनेक सरकारे आली, गेली. कायदे बनले, मोहिमा राबवण्यात आल्या, पण तरीही काही विभाग हे भ्रष्टाचाराचे अड्डे बनले आहेत, जिथे सामान्य म णसाचे काम लाच दिल्याशिवाय होत नाही. काही विभागांची नावं तर अशी आहेत की ऐकून तुम्हालाही आश्चर्य वाटेल. कारण हे तेच विभाग आहेत, जे मुळात जनतेच्या हितासाठी बनवले गेले होते.



काही मिडीया रिपोर्टनुसार, भारतात १० असे मोठे सरकारी विभाग आहेत जे भ्रष्टाचाराच्या विळख्यात अधिक खोल गेलेले आहेत. या यादीत लोकांच्या थेट तक्रारी, माध्यमातील बातम्या आणि ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनलसारख्या संस्थांचे संशोधन यांचा समावेश आहे. यात लोकपाल आणि लोकायुक्तांनी वेळोवेळी मांडलेले तपशीलही ध्यानात घेतले गेले आहेत. ही माहिती राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण ब्युरो (छउखइ) या संस्थेने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर उघडपणे शेअर केली आहे.

या यादीत जे पहिले नाव समोर आले, ते कुठल्याही सामान्य भारतीयासाठी फारसं अनोळखी नाही ते म्हणजे पोलिस विभाग. देशात कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारी ज्या खांद्यांवर असते, त्याच खांद्यांवर लाचखोरी, पक्षपाती कारवाई, बनावट गुन्हे दाखल करणे, आणि तपासाच्या नावाखाली बेकायदेशीर पैसे उकळणे याचे आरोप सिध्द झाले आहेत. कित्येक प्रकरणांत तर सामान्य माणसाला न्याय मिळावा म्हणून लाच द्यावी लागल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

गंमत म्हणजे, अनेकदा जमीन तक्रारी, कौटुंबिक वाद किंवा छोट्या मोठ्या गुन्ह्यांमध्ये पोलिसांची भूमिका निष्पक्ष राहण्याऐवजी राजकीय किंवा आर्थिक दबावाखाली झुकलेली दिसते. काही अधिकाऱ्यांवर तर फसवणूक, धमकावणे, आणि दलालांशी संगनमत असल्याचे आरोप आहेत. हे फक्त एखाद्या राज्यापुरते मर्यादित नाही, तर संपूर्ण भारतभर ही स्थिती एकसारखीच आहे. त्यामुळे पोलिस खातं भ्रष्टाचाराच्या बाबतीत पहिल्या क्रमांकावर आहे.

या यादीतील इतर विभागांचा तपशीलही तितकाच धक्कादायक आहे. काही विभागांमध्ये काम करून घेण्यासाठी शंभर वेळा हेलपाटे घालावे लागतात आणि शेवटी 'नियमाच्या बाहेर' जाऊन पैसे देऊनच फाईल पुढे सरकते. शिक्षण, आरोग्य, नगरपालिका, महसूल, परिवहन अशा अनेक विभागांच्या नावांचा यात समावेश आहे. सरकारी कामकाजात पारदर्शकता आणण्याचे प्रयत्न याआधी अनेक वेळा झाले, पण ते अपुरेच ठरले आहेत.

या यादीमुळे पुन्हा एकदा भ्रष्टाचाराच्या समस्येवर चर्चा रंगली आहे. यामुळे प्रश्न होतो की, जर देशाचा कायदा आणि शासन यंत्रणा चालवणारे लोकच जबाबदारीने वागणार नसतील, तर मग सामान्य माणसाने न्यायाची अपेक्षा तरी कुणाकडून करावी? नागरिकांकडून कर भरला जातो, पण त्याचे फायदे मिळण्याऐवजी अनेकदा त्यांच्यावरच अन्याय केला जातो.

## ५० व्या राज्य स्तरीय योगासन स्पर्धेच्या स्वागताध्यक्ष पदी संतोष सोहनी

**बीड । प्रतिनिधी**



बीड डिस्ट्रिक्ट योग असोसिएशन, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग बीड व महाराष्ट्र योग असोसिएशन यांच्या संयु विद्यमाने बीड येथे दिनांक २२, २३ व २४ ऑगस्ट २०२५ रोजी ५० वी राज्यस्तरीय योगासन स्पोर्टस चॅम्पियनशिप आयोजित केली आहे. या स्पर्धेच्या स्वागताध्यक्ष पदी बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष श्री संतोष (सेठ) सोहनी यांची निवड करण्यात आली आहे. तसेच कार्याध्यक्ष पदावर श्री सचिन ( तात्या) ढेपे व श्री प्रदीप (दादा) क्षीरसागर यांची निवड करण्यात आली आहे. माहे ऑक्टोबर २५ मध्ये योगा फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने रांची (झारखंड) येथे

पन्नासाव्या राष्ट्रीय योगासन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघाची निवड करण्यासाठी बीड डिस्ट्रिक्ट योग असोसिएशन, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग बीड व महाराष्ट्र योग असोसिएशन यांच्या संयु विद्यमाने ५० वी राज्यस्तरीय योगासन चॅम्पियनशिप स्पर्धा बीड येथे होत आहे. दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील ८ ते ६० या वेग वेगळ्या वयोगटातील जिल्हास्तरीय स्पर्धेत पहिले तीन क्रमांक मिळवलेले मुले मुली, महिला पुरुष योग खेळाडू स्पर्धेसाठी बीड शहरात दाखल होतील. दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी आठ वाजता स्पर्धेला सुरुवात होईल .दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी तीन ते पाच या वेळेमध्ये या स्पर्धेचे प्रमुख पाहुण्यांचे उपस्थितीत ▶▶ उर्वरित पान २ वर

## शिवसेना शिंदे गट युवा सेना जिल्हा पदाधिकाऱ्यांचे निवड जाहीर

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशीर्वादाने, शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे (उपमुख्यमंत्री, म हाराष्ट्र राज्य) यांच्या आदेशानुसार, खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना पक्षाच्या युवासेना बीड जिल्हा पदाधिकारी जाहीर करण्यात येत आहे. गणेश शिराळे जिल्हा अध्यक्ष



बीड, रविराज बडे जिल्हा अध्यक्ष, माजलगाव ऋषिकेश लोमटे जिल्हा अध्यक्ष परळी, अजय सुरवसे जिल्हा अध्यक्ष गेवराई, सुजित शिंदे जिल्हा अध्यक्ष केज, सुमित कोळपे जिल्हा अध्यक्ष आष्टी, वैभव जाधव विधानसभा अध्यक्ष आष्टी,सुरज चुगडे विधानसभा अध्यक्ष बीड,अभिजीत घाटूळ विधानसभा अध्यक्ष केज, कैलास कावरे सचिन लांडे विधानसभा अध्यक्ष परळी, सूर्यकांत गव्हाणे तालुका अध्यक्ष बीड, मंगेश वनवे तालुका अध्यक्ष आष्टी,दादा येवले तालुका अध्यक्ष पाटोदा, बबन मोघे तालुका अध्यक्ष शिरूर कासार,अभिजीत कुंबडे तालुका अध्यक्ष गेवराई,बाळासाहेब नागरगोजे तालुका अध्यक्ष माजलगाव, दत्तकुमार काकडे तालुका अध्यक्ष केज, वडवणी, समाधान बडे तालुका अध्यक्ष धारूर, ▶▶ उर्वरित पान २ वर

## कोरोना काळात मराठा आरक्षण प्रश्नावर काढण्यात आलेल्या मोर्चावेळी गुन्हातुन सुरेश धस यांची निर्दोष मुक्तता

**आष्टी । प्रतिनिधी**

कोविड-१९ या साथ रोगाच्या प्रादुर्भाव कालावधीमध्ये जमावबंदी प्रतिबंधक कायदा लागू करण्यात आलेला असताना बीड येथे जिल्हाधिकारी कार्यालयावर आ. सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली मोर्चाचे आयोजन करून प्रतिबंधात्मक कायदा भंग केल्याच्या आरोपावरून आ.सुरेश धस आणि इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता त्याचा आज न्याय निर्णय होऊन आ.सुरेश धस यांचे सह सर्वांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. याविषयीचे सविस्तर ▶▶ उर्वरित पान २ वर



● बीड जिल्हा न्यायालय आणि जिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणी रस्त्यावर डिव्हायडर बसवण्यात यावे अशा मागणीचे निवेदन आ. सुरेश धस यांचे देण्यात आले- ॲड. यासीर पटेल, सचिव, वकील संघ बीड जिल्हा न्यायालय

● आ.सुरेश धस हे सतत सामाजिक न्यायासाठी सतत संघर्ष करत असतात- मराठा समाजास आरक्षण मिळावे यासाठी आयोजित केलेल्या मोर्चामुळे त्यांचे वर खटला दाखल झाला होता या खटल्यामध्ये ज्यांची निर्दो ष मुक्तता झाल्याबद्दल मी त्यांचे सकल मराठा समाजाच्या वतीने मनापासून अभिनंदन करतो.- ॲड. रोहिदास येवले, अध्यक्ष, वकील संघ, बीड जिल्हा न्यायालय

## लाच घेताना व्हिडीओ बनवायला सुरुवात केली, मोबाईल हिसकावण्याच प्रयत्न; मुंबईतील ट्रॅफिक पोलिसाचा व्हिडीओ व्हायरल

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील अनेक रस्त्यांवर ट्रैफिक पोलिस पाहायला मिळतात. गाडी चालकांवर पोलिस तक्ष ठेऊन असतात. रस्त्यांवर ट्रैफिक होऊ नये म्हणून प्रयत्न करत असतात. म ुंबई पोलिस दिवसरात्र डोळ्यात तेल घालून काम करतात. पण, सध्या एका ट्रैफिक पोलिसाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. हा व्हिडीओ मुंबईतील ट्रैफिक पोलिसाचा असल्याचा दावा करण्यात आला आहे. या व्हिडीओमध्ये एक ट्रैफिक पोलिस रिक्षात बसल्याचे दिसत आहे. याम ध्ये पोलिस लाच घेत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.




पुण्यात मध्यरात्री २ तास गावगुंडांचा धुमाकूळ रिक्षा, कार, स्कूल बससह २० ते २५ वाहनांची तोडफोड- यामध्ये एक व्यक्ती कॅमेचावर वाहतूक पोलिसावर ताच घेतल्याचा आरोप करत आहे. यासह त्याच्या नावाच्या प्लेटचा व्हिडीओ देखील बनवत असल्याचे दिसतंय. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर मुंबई वाहतूक पोलिसांच्या हँडलवरूनही एक प्रतिक्रिया आली आहे. व्हायरल व्हिडीओ १ मिनिटाचा आहे, 'त्या रिक्षा चालकाच्या उजव्या खिशात पैसे असल्याचे दिसत असल्याचा दावा व्हिडीओत केला आहे.

या व्हिडीओमध्ये हा व्यक्ती हिंदीमध्ये बोलत आहे. यामध्ये 'लाच द्या साहेब, तुमच्या हातात पैसे आहेत असं तो व्यक्ती बोलत आहे. ऑटोच्या समोर बसलेल्या ड्रायव्हरवर आणि मागे बसलेल्या ट्रैफिक ▶▶ उर्वरित पान २ वर

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या हस्ते बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके मराठवाडा आयकॉन पुरस्काराने सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

शासकिय सेवेत कर्तव्यदक्ष राहून सामान्य नागरिकांसह शेतकऱ्यांच्या न्याय हक्काचे निर्णय घेणाऱ्या , गैरप्रकार करणाऱ्यांवर तालुका दंडाधिकारी म्हणून कठोर भूमिका घेऊन कायद्याने कारवाई करणाऱ्या , शासकिय सेवेत उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या कार्याची दखल घेत ' नवभारत/नवराष्ट्र ' तर्फे मराठवाडा आयकॉन म्हणून सन्मान करण्यात आला.



हा सन्मान सोहळा कार्यक्रम संभाजी नगर येथे हॉटेल रामा इंटर नॅशनल येथे रविवार २० जुलै रोजी पार पडला . यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे , जालन्याचे खासदार डॉ कल्याण काळे , विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या हस्ते तहसिलदार चंद्रकांत शेळके यांना मराठवाडा आयकॉन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी नवभारत समूहाचे ग्रुप प्रेसिडेंट ए. श्रीनिवास , सरव्यवस्थापक कल्याण पांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे शिक्षण बी.ए. , डी. एड. झालेले असून त्यांचे मुळ गाव जळगाव जिल्ह्यात आहे . त्यांना विविध विषयांवर लेखनाची आवड असून त्यांचे प्रासंगिक लेख विविध वर्तमानपत्रांमधून प्रकाशित झालेले आहेत . वैयक्तिक जीवनात सामाजिक, पर्यावरण , साहित्य क्षेत्रात त्यांचा सक्रीय सहभाग असतो . ते ४ ऑगस्ट २००४ रोजी शासकिय सेवेत दाखल झाले . सद्य स्थितीपर्यंत गेवराई, गंगापूर, घनसांगवी, पैठण, अंबड या ठिकाणी तहसीलदार म्हणून सेवा बजावली असून सध्या बीड येथे तहसीलदार म्हणून कार्यरत आहेत , असे ▶▶ उर्वरित पान २ वर

स्वराज सोलार
ॲण्ड वॉटर सोल्युशन
प्रो.प्रा.अजय भोसले
9673798477
8830127742
आमच्याकडे सर्व कंपनीच्या वॉटर फिल्टरची व सोलारची विक्री व दुरूस्ती योग्य दरात केली जाईल.
पत्ता : मधुमीना कॉम्प्लेक्स,प्रियदर्शनी गार्डन,राजीव गांधी चौक,बीड

सुसज्ज आरसीसी इमारत भाड्याने देणे आहे
धानोरा रोड जिजाऊ नगर (शिराळेनगर) बीड येथील चार रूम खाली व चार रूम दुसऱ्या मजल्यावर शासकीय कार्यालय किंवा दवाखाना, मुला-मुलींचे वस्तीगृह, विविध कंपन्यांच्या कार्यालयांकरीता अथवा शाळेकरीता दोन मजली सुसज्ज आरसीसी इमारती भाडयाने देणे आहे.
नवनाथ अण्णा शिराळे ९८२२८७५९४५
गोरख आबा शिराळे ९४२२२९५२३०
संपर्क
हॉटेल जय महाराष्ट्र

## ◆ संपादकीय...

# न्यायाची प्रतीक्षा संपणार कधी ?



वर्ष २००६ मध्ये झालेल्या साखळी बाँबस्फोटाच्या प्रकरणात विशेष न्यायालयात दोषी ठरलेल्या १२ आरोपींची मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. हा निर्णय साखळी बाँबस्फोटात मृत पावलेल्या २०९ लोकांच्या कुटुंबियांवर झालेला केवळ आघात नव्हे, तर तो भारताच्या सार्वभौमत्वावर, त्याच्या अस्मितेवर झालेला आघात होता. त्यामुळे हे घृणास्पद कृत्य करणाऱ्यांच्या मुसक्या आवळून, त्यांच्या विरोधात जलद गती न्यायालयात खटला चालवून काही महिन्यांच्या आत त्यांना फाशीची शिक्षा होणे अपेक्षित होते ; मात्र या घटनेला १९ वर्षे झाली असतांना बाँबस्फोट करणारे मोकाट आहेत आणि ज्यांच्यावर हा आघात झाला. ते हतबल आहेत. आक्रोश करण्यापलीकडे त्यांच्या हाती काहीही उरलेले नाही. या प्रकरणात दोष कुणाचा ? देशावर एवढा मोठा आघात होऊनही या प्रकरणातील दोषी कोण ?', या सूत्राकडे येऊन जर चर्चा थांबत असेल, तर यासारखी तज्ज्ञास्पद गोष्ट काय असू शकते ? 'आतंकवादाच्या विरोधात शून्य संवेदनशीलतेचे धोरण अवलंबणार, असे सरकारकडून सांगितले जाते ; मात्र १९ वर्षांपूर्वी आतंकवाद्यांनी केलेल्या साखळी बाँबस्फोटांचे आतंकवादी जर आजही मोकाट असतील, तर याविषयी सरकारने गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. या धक्कादायक निकालामुळे अन्वेषण यंत्रणांचा नाकर्तेपणाचा बुरखा फाडला गेला. हेही तितकेच खरे ! या प्रकरणाचे अन्वेषण आतंकवादविरोधी पथकाने केले होते. या पथकाचे तत्कालीन प्रमुख के. पी. रघुवंशी यांनी या प्रकरणाचे कसून अन्वेषण केले असल्याने राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावावे, असे मत व्यक्त केले आहे. रघुवंशी ज्याला ठोस अन्वेषण म्हणत आहेत, त्याचे मुंबई उच्च न्यायालयाने वाभाडे काढले आहेत. याचा साकल्याने अभ्यास केल्यास भारतातील अन्वेषण यंत्रणा अन्वेषणाच्या नावाखाली नेमके काय करतात ?', असा संतप्त प्रश्न नागरिकांच्या मनात निश्चित उपस्थित होणार आहे. या प्रकरणी अन्वेषण यंत्रणांनी इलेक्ट्रॉनिक पुरावे सादर केले होते. 'हा डेटा तुम्ही कुठून आणलात ? इतक्या वर्षात हे पुरावे कुणाच्या निगराणीखाली होते ?, असा प्रश्न न्यायालयाने विचारल्यावर संबंधित अधिकाऱ्यांना समाधानकारक उत्तरे देता आली नाहीत. त्यामुळे या पुराव्यांशी कुणी छेडछाड केली का ? अशी शंका उपस्थित झाल्याने हे पुरावे ग्राह्य धरता आले नाहीत. विचार करा, अशा प्रकरणांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, भ्रमणभाषवरील कॉल्स आदी सर्व पडताळले जातात. हे महत्त्वाचे असते ; कारण त्याद्वारे दोषींपर्यंत पोचता येते. अन्वेषण यंत्रणांनी हे सर्व गोळा केले ; मात्र न्यायालयीन कार्यपद्धतीनुसार ते पुरावे म्हणून सादर करण्यासाठी त्यांचे कायद्याच्या अखत्यारीत राहून ज्या पद्धतीने जतन करावे लागते, ते सुयोग्य प्रकारे केलेच गेले नाही. अशा मोठ्या अन्वेषणांमध्ये अनुभवी, कायद्याचे ज्ञान असलेले आणि तडफदार अधिकारी-कर्मचारी यांची नियुक्ती केलेली असते. अशांना इलेक्ट्रॉनिक पुराव्यांचे जतन करण्याचे साधे ज्ञानही नसावे ? याविषयी हसावे कि रडावे ? याविषयी पोलिसांकडून जे साक्षीदार न्यायालयात सादर करण्यात आले. त्यांनी वारंवार त्यांची साक्ष पालटली. यावरून एकतर साक्षीदारांना कुठून तरी शोधून त्यांना पट्टी पढवून न्यायालयात उपस्थित करण्यात आले होते किंवा त्यांच्यावर कुणाचा तरी दबाव होता. त्यांच्यावर दबाव असल्यास या समस्येचे निराकरण करणे पोलिसांचे काम होते. दबाव नव्हता. तर मग त्यांच्या साक्षीत विपर्यास का होता ? फॉरेन्सिक अन्वेषणाची कमतरता असणे, या कळीच्या सूत्रावर उच्च न्यायालयाने बोट ठेवते हे साखळी बाँबस्फोट घडवण्यासाठी जे सामान वापरण्यात आले होते आणि दोषी यांच्याकडे मिळालेले सामान एकप्रकारचेच होते, याची चाचपणी न्यायालयाने केल्यावर न्यायालयाला त्याचे उत्तर 'नाही' असे मिळाले. महत्त्वाचे म्हणजे या १२ जणांना पकडल्यावर त्यांची परेड करण्यात आली ; मात्र ती कायद्याच्या चौकटीला धरून नव्हती. त्यामुळे न्यायालयात ती ग्राह्य धरता आली नाही. एखाद्या प्रकरणाचे अन्वेषण करतांना जे पुरावे गोळा करण्यात येतात, ते कायद्याच्या कसोटीसमोर टिकतील का, हे पहाणे आणि तशा अभ्यासपूर्ण पद्धतीने पुरावे सादर करणे, हे अन्वेषण यंत्रणेचे दायित्व आहे ; मात्र न्यायालयाने जी निरीक्षणे नोंदवली, त्यावरून आतंकवादीविरोधी पथकाने हे संवेदनशील प्रकरण किती असंवेदनशील पद्धतीने हाताळले, हे लक्षात येते. या पूर्ण प्रकरणात आतंकवादविरोधी पथकाच्या कार्यशेतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित होतात. मागील २०-२५ वर्षांमध्ये भारतात असंख्य देशविघातक कारवाया झाल्या. त्यांच्या सुनावण्या विविध न्यायालयांत चालू आहेत ; मात्र आतंकवाद्यांना फाशीपर्यंत पोचवण्यासाठी सादर केलेले पुरावे कार्यपद्धतीनुसार आहेत का ?. अशी शंकेची पाल या निकालामुळे लोकांच्या मनात चुकचुकत आहे. केवळ आतंकवादविरोधी पथकच नव्हे, तर सर्व अन्वेषण यंत्रणांमध्ये अशा काही सदोष कार्यपद्धती असतील, तर त्याचा शोध घेऊन ते दुरुस्त करण्यासाठी आता प्रयत्न कायला हवेत अन्यथा सगळेच मुसळ केरात', असे म्हणण्याची वेळ येणार आहे. हे साखळी बाँबस्फोट लष्कर-ए-तोयबा आणि पाकिस्तानची गुप्तचर यंत्रणा आय. एस.आय.ने घडवून आणल्याचे पुढे आले होते. या प्रकरणात प्रत्यक्ष हात असणारे पाकिस्तानात पळून गेल्याचे सांगण्यात येते. त्यांचे पुढे काय झाले ? वर्ष १९९३ मध्ये दाऊद याने मुंबईत बाँबस्फोट घडवून तो पाकिस्तानात पसार झाला. भारतातील कुठल्याही राष्ट्रविरोधी कारवायांमध्ये पाकिस्तानचा हात असतोच. येथे कारवाया करून नंतर पाकिस्तानात पसार होणारे बिर्याणीचा आस्वाद घेतात आणि आपल्या सुरक्षायंत्रणा मात्र हात चोळत बसतात हे आणखी किती वर्षे चालणार आहे ? वर्ष २००६ चे प्रकरण आणि विशेष न्यायालयात त्याचा निकाल वर्ष २०१५ मध्ये लागला. त्यानंतर उच्च न्यायालयात त्याचा निकाल वर्ष २०२५ मध्ये लागला. आता राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात या निर्णयाला आव्हान देणार आहे. त्याचा निकाल कधी लागणार ? भारतात प्रलंबित खटल्यांची संख्या कोटींमध्ये आहे ; मात्र साखळी बाँबस्फोट घडवून राष्ट्राच्या विरोधात युद्ध पुकारणाऱ्या नराधमांच्या विरोधातील खटले तरी जलद गतीने चालवायला हवे होते. अशा प्रकारे सुस्तपणे वर्षानुवर्षे खटले चालवून जनतेला न्याय मिळणार आहे का ? या प्रश्नाचे सकारात्मक उत्तर सरकारने देणे अपेक्षित आहे, अन्यथा भारतात न्याय मिळण्यासाठी प्रतीक्षा करा. हेच प्राक्तन सामान्य जनतेच्या भाळी लिहिले आहे. असे दुर्दैवाने म्हणण्याची वेळ जनतेवर येईल !

# गुरुपुष्यामृत योग, पण त्याच दिवशी अमावास्या; सोनेखरेदी करावी की टाळावी?

२४ जुलै रोजी दीप अमावस्या आहे आणि त्याच दिवशी गुरुवारी पुष्य नक्षत्र आल्याने गुरु पुष्यामृत योग जुळून आला आहे. हा योग सोनेखरेदीसाठी शुभ मानला जातो. या मुहूर्तावर केलेली सोने खरेदी ही वृद्धिंगत होणारी असते, म्हणजे त्यात वाढ होत जाते. मात्र अनेकांनी असाही प्रश्न उपस्थित केला आहे, की अमावास्येच्या मुहूर्तावर सोनेखरेदीसारखे शुभ कार्य करावे का ? याबाबत रवी क्षीरसागर गुरुजी यांनी दिलेले स्पष्टीकरण जाणून घेऊ.

अमावास्या अशुभ की शुभ ? सर्वप्रथम अमावस्या ही तिथी अशुभ नाही. उलट दिवाळीत आश्विन अमावस्येला आपण लक्ष्मीपूजन करतो. त्यामुळे पोर्णिमा, अमावस्या या लक्ष्मी मातेच्या प्रिय तिथी आहेत आणि मंगळवार, शुक्रवार हे आवडते वार आहेत. त्यामुळे इतर वेळीही अमावस्या अशुभ ठरवण्याचे काहीच कारण नाही. अशातच आषाढ अमावस्या जिला आपण दीप अमावस्या किंवा दिव्यांची आवस असे म्हणतो, ती तर दिव्यांचे पूजन करून अज्ञान, आळस, अंधश्रद्धेचा अंधार घालवणारी आहे. त्यामुळे तीदेखील वर्ज्य ठरत नाही.

गुरु पुष्यामृत नक्षत्राबद्दल- पुष्य नक्षत्राबाबत सांगायचे तर या




मुहूर्तावर केलेले कोणतेही कार्य वर्धिष्णू ठरते. म्हणजेच वाढत जाते. या मुहूर्तावर विद्यादान केले जाते, सोने, घर, जमीन खरेदी केली जाते. मात्र विवाह, साखरपुडा केला जात नाही. कारण अशा गोष्टी वारंवार होणे शुभ लक्षण नाही. म्हणून मंगलकार्य वगळता इतर कोणतीही शुभ कार्य या मुहूर्तावर केली जातात. भारतात प्राचीन काळापासून सोन्याला महत्त्व आहे. हा शुद्ध आणि शुभ धातूसुद्धा आहे. त्यामुळे त्याची किंमत कधीही कमी होत नाही, उलट वाढतच जाते. म्हणून लोक सोन्याच्या दागिन्यांमध्ये गुंतवणूक करतात. मग प्रश्न राहिला अमावस्येच्या मुहूर्तावर आलेल्या गुरु पुष्यामृत योगाचा आणि सोने खारेदीचा, तर जाणून घ्या, २४ जुलै रोजी जुळून आलेला हा दुर्मिळ योग आहे. एवढेच नाही तर तो सुवर्ण वृद्धी योग आहे. ज्योतिष शास्त्राच्या दृष्टिकोनातून पाहता हा योग अक्षय्य तृतीयेइतकाच महत्त्वाचा ठरेल. या मुहूर्तावर केलेली सुवर्ण खरेदी लाभदायी ठरेल. त्यात वाढच होत राहील. तसेच या मुहूर्तावर खरेदी केलेले सोने कधीही विकावे लागण्याची वेळ येणार नाही! २४ जुलै रोजी अमृत मुहूर्तावरच करा सोनेखरेदी, जाणून घ्या शुभ काळ गुरुपुष्यामृत सायंकाळी ४.४३ ते दुसऱ्या दिवशी शुक्रवारी सकाळी ६.१५ पर्यंत आहे आणि अमावस्या तिथी २४ तारखेला रात्री १२.४० मिनिटांनी समाप्त होणार आहे. अशातच अमृत योगावर सोने खरेदी शुभ ठरणार आहे. सोने खरेदीसाठी अमृत काळ दुपारी ३.०५ मिनिटांपासून ते सायंकाळी ५.३ मिनिटांपर्यंत.

◆ पान ४ वरून पुढे...

## ५० व्या...

बक्षीस वितरण होईल. या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये पहिले तीन क्रमांक प्राप्त झालेले योग खेळाडू पन्नासव्या राष्ट्रीय योगासन स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करतील. बीड जिल्ह्यात योगा चा प्रचार व प्रसार व्हावा या हेतूने पहिल्यांदाच योगासनाची राज्यस्तरीय स्पर्धा होत असून या स्पर्धेचा बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन बीड डिस्ट्रिक्ट योग असोसिएशन चे अध्यक्ष विनायक वझे ,महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग बीडचे जिल्हाध्यक्ष विकास गवते व संयोजन समितीचे सदस्य माधव काळकुटे, अविनाश इगडे, ॲड गीता वझे, सुहास लोहिया, श्रीमती प्रवीण वाघमारे ,विजय डोंगरे, विष्णू कानगावकर, बाबासाहेब कुडके, रामचंद्र ठोसर, शिवाजीराव घोडके, योगेश्वर सानप ,अमोल मस्के ,बाळासाहेब पवार ,रामकृष्ण राऊत ,उद्धव लाड, संतोष पडोळे ,लक्ष्मण मळेकर ,विष्णू चौधरी ,जितेश बारसकर, बापूराव राख ,अशोक खोसे, योगेश म्हेत्रे, प्रल्हाद राजुरीकर, नितेश कठाळे यांनी केले आहे.

## शिवसेना शिंदे...

बाबा सोनवणे तालुका अध्यक्ष परळी, समीर मसलकर तालुका अध्यक्ष आंबेजोगाई, यांची निवड करण्यात आली असून ही निवड पुर्वेश परिषा प्रताप सरनाईक युवासेना कार्याध्यक्ष, राहुल लोंढे युवासेना मुख्य सचिव किरण साळी युवासेना सचिव - महाराष्ट्र राज्य,, निलेश शिंदे युवासेना मराठवाडा सचिव,विपुल पिंगळे युवासेना मराठवाडा निरीक्षक,बाजीराव चव्हाण युवासेना मराठवाडा निरीक्षक यांच्या विंनतीनुसार व शिवसेना जिल्हा प्रमुख अनिलदादा जगताप, शिवसेना जिल्हा प्रमुख सचिन मुळुक, शिवसेना जिल्हा प्रमुख स्वप्नील भैय्या गलधर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना पक्षाच्या युवासेनेच्या बीड जिल्हा पदाधिकारी निवडी जाहिर करण्यात आल्या.या निवडीबद्दल सर्व पदाधिकाऱ्यांचे कार्यकर्त्यांच्या वतीने स्वागत करण्यात येत आहे.

## कोरोना काळात...

वृत्त असे की, मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी आमदार सुरेश धस यांनी यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर कार्यालयावर लाखोंच्या संख्येने मोर्चा आयोजित केला होता तात्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या काळात कोविड-१९ चे निमित्त समोर करून प्रतिबंधात्मक कायदा भंग केल्याचे दाखवून आमदार सुरेश धस आणि इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. वास्तविक पाहता हा मराठा समाज आरक्षण विषयी असलेल्या सामाजिक मागणीसाठी लाखोंच्या उपस्थितीत बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात होता हा मोर्चा समाजहित डोळ्यासमोर ठेऊन हा मोर्चा काढण्यात आला होता. मराठा आरक्षणासाठी शासनाच्या विरोधात मोर्चा काढला म्हणून आमदार सुरेश धस आणि इतर संयोजक यांचे विरुद्ध कलम १८८,२७९,२८० भादवि सह कलम ५१(ब) तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ सह कलम २,३,४ साथीचे रोग कायदा प्रमाणे गुन्हा दाखल केला. आ.सुरेश धस यांच्या सह..पाटोदा नगराध्यक्ष राजू जाधव, लोकनेते गोपीनाथ रावजी

◆ पान ४ वरून पुढे...

ऊस तोड कामगार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सुखदेव अप्पा सानप,जि.प सदस्य माऊली जरांगे, युवा नेते सचिन उबाळे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे प्रदेशाध्यक्ष यशवंत खंडागळे,शेख वसीम, लोकनेते गोपीनाथरावजी ऊसतोड कामगार संघटनेचे प्रदेश प्रवक्ते अभिजीत शेंडगे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष मीरा गांधले यांच्यावर हा खटला दाखल करण्यात आला होता. दि.२३ जुलै रोजी बीड न्यायालयाने आमदार सुरेश धस यांच्यासह मा.आ. लक्ष्मण पवार, मा.आ. आर.टी.देशमुख, राजेंद्र जाधव ,भारत जगताप,यांचीही निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. आमदार सुरेश धस हे समाजासाठी अहोरात्र कार्य करणारे लोकप्रतिनिधी आहेत. आतापर्यंत मराठा आरक्षण प्रश्नासाठी शासन दरबारी प्रयत्न केले आहेत मराठा आरक्षणासाठी विधानसभेपासून रस्त्यावरच्या लढाई मध्ये सतत समाजासोबत शासनाकडे लढाई लढत आहेत.. अशा प्रकारचे चार-पाच खटले त्यांच्यावर आष्टी न्यायालयात देखील दाखल झाले होते त्यात देखील ते निर्दोष सुटले आहेत अशा प्रकारचे त्यांच्यावर खटले दाखल झाले तरीही समाजकार्याचा वसा आणि वारसा त्यांनी जोपासला आहे.. या खटल्यामध्ये आमदार सुरेश धस आणि इतरांच्या बाजूने ॲड.नामदेव साबळे आणि ॲड. दिनेश हंगे आणि सहकाऱ्यांनी काम पाहिले... याप्रसंगी न्यायालयामध्ये उपस्थित वकील बांधवांनी त्यांचे अभिनंदन केले.

## लाच घेताना...

पोलिसावर पैसे घेतल्याचा आरोप करू लागतो. त्याला उत्तर म्हणून ऑटोचालक खिशातून रिकामा हात काढतो आणि दाखवतो आणि म्हणतो पैसे नाहीत. पण तो व्यक्ती त्याच्यावर आरोप करतो आणि म्हणतो त्यांनी माझ्यासमोर पैसे घेतले आहेत.' यानंतर तो वाहतूक पोलिसाच्या गणवेशाच्या नेम प्लेटवरील नाव दाखवतो. यावर त्या पोलिसाचे नाव 'दिनेश युवराज पाटील' असे लिहिलेले दिसत आहे. यानंतर वाहतूक पोलिस त्याचा फोन हिसकावून घेण्याचा प्रयत्न करतो तेव्हा तो व्यक्ती म्हणतो, 'त्याला हात लावू नको, तुम्ही ऑटोमध्ये बसून ताच घेत आहात. यानंतर तो माणूस कॅमेरा ऑटो चालकाकडे वळवतो आणि लाचेचे पैसे त्याच्या उजव्या खिशात असल्याचा दावा करतो. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. मुंबई वाहतूक विभागाने दखल घेतली सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर हा व्हिडीओ पोस्ट सहरीज्ञशज्ञरश्रशीह या खात्यावरुन पोस्ट केला आहे. या कॅप्शनमध्ये म्हटले आहे की, मुंबई, महाराष्ट्रातील वाहतूक पोलिस ऑटो चालकाकडून लाच घेताना पकडले. आतापर्यंत या व्हिडिओला २५ हजारांहून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. तर पोस्टला ५०० हून अधिक लाईक्स आणि अनेक कमेंट्स मिळाल्या आहेत. दरम्यान, या पोस्टवर मुंबई ट्रैफिक पोलिसांच्या एक्स खात्यावरुन कमेंट केली आहे. यामध्ये 'कृपया आम्हाला संपूर्ण पत्ता देण्याची विनंती आहे., असं म्हटले आहे.

## विरोधी पक्षनेते...

यावेळी कार्यक्रमात सांगण्यात आले . तहसीलदार शेळके हे बीडला रुजू झाल्यापासून त्यांनी सर्वसामान्य जनतेच्या कामांचा धडाका लावला आहे . विशेषतः शिव पानंद रस्ते खुले करून देण्यासाठी ते स्वतः जातीने हजर राहून रस्ते खुले करून देत आहेत.

◆ पान ४ वरून पुढे...

कार्यालयात येणाऱ्या लोकांशी सौजन्याने वागून प्रत्येकाचे प्रश्न समजून घेत आहेत . त्यामुळे बीडच्या जनतेला ते आपलेसे वाटायला लागलेले आहेत . २०१२ ते २०१५ या कालावधीत गेवराईला तहसीलदार असताना तहसीलदार शेळके यांनी नागरिकांचे अनेक प्रश्न लावले होते. सुमारे शंभर किलोमीटर रस्ते त्यांच्या कालावधीत झाले होते. त्यामुळे गेवराईचे नागरिक अजूनही त्यांची आठवण काढतात . त्यावेळी जिल्हाधिकारी म्हणून सुनील केंद्रेकर कार्यरत होते . केंद्रेकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अनेक लोकहिताचे उपक्रम राबविले होते . २०१४ साली दुष्काळाच्या कालावधीत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल बीडच्या वृत्तपत्रांनी त्यांची दखल घेऊन विशेष बातम्या ही छापल्या होत्या . संभाजीनगरमधील गंगापूर व पैठण येथे तहसीलदार म्हणून कार्यरत असताना विविध निवडणुका शांततापूर्ण पद्धतीने घेणे , संजय गांधी श्रावण बाळ योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देणे , रस्ते काढून देणे यासाठी स्थानिक शेतकरी आजही त्यांचे नाव घेतात. २०२३ साली अंबड येथे कार्यरत असताना मनोज जरांगे यांचे उपोषण , यावेळी झालेला लाठी हल्ला आणि एकंदरीतच कायदा व व्यवस्था याबाबत मोठा प्रश्न निर्माण झाला होता . वरिष्ठांच्या मदतीने ही परिस्थिती कुशलरीत्या हाताळल्यामुळे तहसीलदार शेळके यांचा अनुभव अधिकच दुणावला . विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आपल्या मनोगतात असे सांगितले की , मराठवाडा आयकॉन मिळाल्याने आपली जबाबदारी अधिक वाढते . 'आयकॉन' या शब्दाचा अर्थ मी कोण ? असा होतो , त्यामुळे आपण स्वतःची ओळख जाणून समाजासाठी सातत्याने कार्यरत राहणे आवश्यक आहे . हा पुरस्कार केवळ सन्मान नसून इतरांना आणि स्वतःलाही प्रेरणा देणारा आहे . खासदार डॉ. कल्याण काळे यांनी ' मराठवाड्याचे ' मुख्य आकर्षण 'मराठवाडा आयकॉन पुरस्कार वितरण समारंभ ', हे ठरले आहे , असे नमूद केले . या सोहळ्यात मराठवाड्यातील विविध भागात आणि विविध क्षेत्रात उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रेरणादायी व्यक्ती आणि संस्थांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले . या कार्यकर्त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे समाजात जागृती निर्माण होत आहे आणि सकारात्मक बदल घडत आहेत , असे नमूद केले . त्यांनी नवभारत समूहाचे कौतुक करताना सांगितले की, नवभारत / नवराष्ट्रने सुरू केलेला हा उपक्रम समाजासाठी अत्यंत चांगला आहे . समाजातील प्रेरणा देणाऱ्या लोकांना पुढे आणणे ही काळाची गरज आहे . तसेच सरकार कुठे चुकते याबाबत परखड भूमिका घेणेही आवश्यक आहे , कारण अशा मतांमुळे समाजाला योग्य दिशा मिळते. नवभारत समूहाचे याबद्दल मनःपूर्वक कौतुक आहे. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले की, नवभारत समूहाचा हा स्तुत्य उपक्रम आहे . समाजात ज्या लोकांनी उल्लेखनीय कार्य केले आहे, त्यांचे कार्य माध्यमांनी पुढे आणणे गरजेचे आहे. बीड तालुक्यातील मसेवाडी मुळकवाडी येथील वादग्रस्त रस्ता, ढेकणमोह येथील वादग्रस्त शिवरस्ता असो की यासारखे अनेक रस्त्यांचे प्रश्न असो , तहसीलदार शेळके यांनी चुटकीसरशी मार्गी लावले . असे तहसीलदार मिळाले तर तालुक्यातील प्रश्न शिल्लकच राहणार नाही अशी बीडच्या सर्वसामान्य जनतेची भावना या निमित्ताने प्रकर्षाने जाणवली. अशा शासकीय अधिकाऱ्यांचा सन्मान करणे उचितच आहे. यानिमित्ताने त्यांच्या पुढील कार्यास, पुढील वाटचालीस शुभेच्छा !

◆ पान ९ वरून पुढे...

## रिपब्लिकन सेना...

यांनी दिली आहे. रिपब्लिकन सेनेच्या माजलगाव तालुका अध्यक्ष म्हणून वशिष्ठ लांडगे यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष म्हणून वैजनाथ गडसिंग, संतोष खुणे, सचिव विलास खळगे सहसचिव शेख आर्षद भाई, संघटक गंगाधर सोनपसारे सहसंघटक विश्वनाथ तोडके, सल्लागार राजकुमार सोनवणे , विलास आप्पा गायसमुद्रे, कोषाध्यक्ष विशाल ससाने यांची निवड करण्यात आली असून या बैठकीस पंडीत ओव्हाळ बालासाहेब शिंदे चंद्रकांत टाकणखार सय्यद अन्वर राहूल सिरसट भास्कर पौळ अशोक जाधव निवृत्ती गायकवाड सय्यद नासेर बद्धप्रेम डावरे महीपती कदम मोकिंदा खरात यांच्या सह जिल्ह्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.

## निम्मा खरीप...

केली जात आहे. त्यामुळे वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांनी अशा बँकांना तात्काळ धडा शिकवावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे. यासाठी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार आहे. अक्सिस बँकेला ३५ कोटी व कोटक महिंद्रा बँकेला ३ कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले असतानाही या दोन्ही बँकांनी एकाही शेतकऱ्याला पीककर्ज दिलेले नाही. एचडीएफसी बँकेला १८ कोटींचे उद्दिष्ट देण्यात आले असून त्यांनी ११ कोटी ९० लाख रुपयांचे कर्जवाटप (६६ %) केले आहे. आरपीएल बँकेने केवळ ६ कर्जदारांना ९३ लाख रुपयांचेच पीककर्ज दिले आहे. आयसीआयसीआय बँकेने कळविलेला आकडा हा इतर प्रकारच्या कर्जाचा असून तो शेतकरी कर्जवाटपात दाखवून शासनाची दिशाभूल केल्याचे उघड झाले आहे. याउलट जिल्हा बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, स्टेट बँक ऑफ इंडिया आदींनी चांगले कर्जवाटप केले आहे. मात्र खाजगी बँकांच्या उदासीन धोरणामुळे शेतकरी त्रस्त आहेत.

## परळी (वैद्यनाथ) ...

वैद्यनाथांच्या मंदिराजवळ संपन्न (रुजू) करण्यास बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील सर्व केंद्रातील सर्व सेवेकरी प्रतिनिधी यांनी सोबत दिलेल्या नियोजनानुसार २५ जुलै ते ३ ऑगस्ट या कालावधीमध्ये त्या त्या तारखेला आपल्या केंद्रातून जास्तीतजास्त संख्येने सेवेकरी आणि भाविकांना घेऊन या सेवेस दररोज सकाळी ठीक १० वाजता उपस्थित रहावे, सेवेचे नियोजन- १) परळी तालुका २५ आणि २६ जुलै, २) अंबाजोगाई तालुका- २७ आणि २८ जुलै, ३) माजलगाव तालुका-

◆ पान ९ वरून पुढे...

२९ जुलै, ४) गेवराई तालुका ३० जुलै ५) परळीसह आसपासचे इतर तालुके गंगाखेडसह - ३१ जुलै, ५) केज, धारुर आणि वडवणी तालुका- १ ऑगस्ट, ६) पाटोदा, शिरूर आणि आष्टी तालुका २ऑगस्ट, ७) बीड तालुका- सर्व केंद्र ३ ऑगस्ट, तसेच परळी शहरातील सर्व केंद्रांनी शक्यतो दररोज या सेवेचे नियोजन करून सेवेत सहभागी व्हावे. सेवेचा क्रम- १. श्री स्वामी स्तवन १ वेळा, २. श्री स्वामी समर्थ मंत्र १ माळ, ३. श्री महामृत्युंजय मंत्र १ माळ, ४. श्री रुद्र पाठ वाचन ११ आवर्तन/११ वेळा, ५. श्री कालभैरव अष्टक ११ वेळा, ६. प्रार्थना व सांगता वरील सर्व सेवा श्री दिंडोरी दरबार व श्री गुरुपीठ यांच्या नियमांचे व आचारसहितेचे पालन करुन सेवा करावी कार्यक्रम ठिकाणी प्रसाद फराळ व्यवस्था केली जाईल. तरी जास्तीत जास्त सेवेकऱ्यांनी आणि भाविकांनी या सेवेत सहभाग घ्यावा असे आवाहन श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, भाग्यनगर, बीड यांनी केले आहे.

## भाजपच्या रक्तदान...

नेत्यांचा वाढदिवस राज्यभर उत्साहात साजरा केला जात असून बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीने देखील विविध कार्यक्रमाचे आयोजन करून मोठ्या प्रमाणात व उत्साहात वाढदिवस साजरा करण्याचे ठरवले आहे. बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचा जिल्हा कार्यालयात संपन्न झालेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन सकाळी ठीक दहा वाजता भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख जिल्हा सरचिटणीस ऍडव्होकेट शिवाजीराव तांबे प्रा.देविदास नागरगोजे नवनाथ शिराळे अशोक सेठ लोढा, यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. भारतीय जनता पार्टीच्या या दोन्ही नेत्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामध्ये जिल्हा भरातील १६ मंडलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन मोठ्या प्रमाणात रक्तदान केले आहे. जिल्ह्यातील सर्व ठिकाणी झालेल्या या रक्तदान शिबिरामध्ये सहभागी झालेल्या रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले . जिल्हा कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराच्या यशस्वीतेसाठी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस ॲड. सर्जेराव तांदळे, प्रा. देविदास नागरगोजे, नवनाथ शिराळे ,बीड मंडळ अध्यक्ष अशोक लोढा बालाघाट मंडळ अध्यक्ष अशोक रसाळ सलिम जहागीर, विक्रांत हजारी, चंद्रकांत फड, श्रीमती भाग्यश्री ढाकणे,शांतीनाथ डोरले, अजय सवाई, दादासाहेब नन्नवरे , संध्याताई राजपूत, अशोक घोडके, मीराताई गांधले, संगीता धसे, प्रीत कूकडेजा, अनिता जाधव, अमोल वडतिले, राजू शहाणे, केशव बडे प्रमोद रामदासी, हरीश खाडे, विष्णू महाराज, नरेश पवार, कपिल

◆ पान ९ वरून पुढे...

सौदा विलास बामणे अमोल वरती यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. रक्तदान शिबिरासाठी सहकार्य करणाऱ्या बीड ब्लड बँकचे जनसंपर्क अधिकारी श्री. रवी किरण गिरी यांच्यासह संपूर्ण स्टाफने केलेल्या सहकार्य बद्दल भारतीय जनता पार्टीच्या वतीने त्यांचे स्वागत करून सर्वांचे आभार व्यक्त केले . रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी बीड शहर मंडळाच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले.

## सुधारित पीक...

सहभाग ऐच्छिक आहे. ई-पीक पाहणी आणि विमा घेतलेले पीक यात तफावत आढळल्यास विमा अर्ज रद्द होईल आणि भरलेला विमा हप्ता जप्त केला जाईल.केंद्रशासनाने विमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी ४० रुपये मानधन निर्धारित केल्याप्रमाणे संबंधित विमा कंपनीमार्फत सीएससी विभागास दिलेजाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा विमा हप्ता व्यतिरिक्त इतर शुल्क सीएससी चालकांना देऊनये.मंजूर नुकसान भरपाई अर्जदाराच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट केंद्रशासन पोर्टलवरून जमा करण्यात येणार आहे. सर्व पिकांसाठी जोखीमस्तर ७० टक्के आहे. एखाद्या अर्जदाराने बोगस किंवा फसवणूक करून विमायोजने चा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना पुढीलकिमान ५वर्ष काळ्या यादीत टाकून शासनाच्या कोणत्याही योजनेचा लाभ दिला जाणार नाही, याची नोंद घेण्याचेही जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी कळविलेआहे. कर्जदार शेतकऱ्यांस योजनेत सहभागी होण्याचे बंधनकारक नाही. मात्र त्यासाठी शेतकऱ्याने योजनेच्या अंतिम तारखेच्या सात दिवस आधी संबंधित बँकेस विमा हप्ता न भरण्याबाबत लेखी कळविणे आवश्यक आहे. तर बिगर कर्जदार शेतकऱ्याने आपला सीळडींरलज्ञ नोंदणी क्रमांक (फार्मरआडी), सातबारा उतारा, बँकपासबुक, आधरकार्ड व पीक पेरणीचे स्वयंघोषणापत्र घेऊन प्राधिकृत बँकेत विमा अर्ज देवून व हप्ता भरून सहभाग घ्यावा. विमा योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकरी कॉमन सर्विस सेंटर (CSC) आपले सरकार पोर्टल किंवा www.pmfby.gov.in या पोर्टलचे सहाय्य घेऊ शकतात. योजनेत भाग घेतलेल्या शेतकऱ्यांनी नंतर ई-पीक पाहणी नोंद पूर्ण करून घेणे बंधनकारक आहे. या योजनेच्या अधिक माहितीसाठी किंवा नुकसान भरपाईच्या माहितीसाठी केंद्र शासनाच्या कृषी रक्षक पोर्टल हेल्पलाईन १४४४७ वर, बीड जिल्ह्यासाठी असलेली विमा कंपनी आयसीआयसीआय लोंबार्ड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड आणि स्थानिक सहायक कृषी अधिकारी, उपकृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी या कार्यालयांशी संपर्क साधावा, असेही श्री. साळवे म्हणाले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका शिवसंग्राम ताकतीनिशी लढणार

## स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लढायच्या अन् जिंकायच्या : डॉ. ज्योती मेटे


### ● निवडणुकीच्या तयारीला लागा - प्रभाकर कोलंगडे



बीड । प्रतिनिधी

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसंग्रामने मोर्चे बांधणी सुरू केली आहे. दि. २३ जुलै रोजी शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी सर्कल निहाय आढावा बैठका घेतल्या यात त्यांनी सर्कल , गण निहाय प्रमुख कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्याशी चर्चा करत येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांने कामाला लागण्याच्या सूचना दिल्या. येणाऱ्या काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसंग्रामने मोर्चे बांधणी सुरू केली आहे. काल शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती मेटे यांनी पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करून सर्कल निहाय आढावा घेतला. या बैठकीसाठी सर्कल तसेच पंचायत समिती गण व विविध गावातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मागील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत शिवसंग्राम संस्थापक अध्यक्ष लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्यावर विश्वास ठेवत मतदारांनी चार जिल्हापरिषद आणि तीन पंचायत समिती सदस्य निवडून दिले होते .परंतु या निवडणुकीत दुर्दैवाने साहेब आपल्या नाहीत त्यांच्या पश्चात आपल्याला आपल्या विचारांचे लोकप्रतिनिधी स्थानिक स्वराज्य संस्थेत पाठवावे लागतील यासाठी सर्वांनी निवडणुकीच्या तयारीला लागा शिवसंग्राम या निवडणुका संपूर्ण ताकतीनिशी लढणार आहे. युती होईल अथवा आघाडी होईल याची कार्यकर्त्यांनी कोणत्याही प्रकारची चिंता करण्याचे कारण नाही. स्थानिक पातळीवर योग्य तो निर्णय घेतला जाईल जे सोबत येतील त्यांच्या सोबत किंवा त्यांच्या शिवाय ही निवडणूक लढवली जाईल मात्र ही निवडणूक लढायची अन् जिंकायची प्रतिज्ञा करून आपण काम करा यश नक्की आपले असेल असे प्रतिपादन यावेळी डॉ. ज्योती मेटे यांनी केले तसेच येणाऱ्या काळात निवडणुकीला कशाप्रकारे सामोरे जायचे या संदर्भात शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे यांनी कार्यकर्ते, पदाधिकारी यांना मार्गदर्शन केले आणि निवडणुकीच्या तयारीला लागा असे मूलमंत्र दिले. या प्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे , जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव,जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, तालुकाध्यक्ष पंडित माने , मनिषा कुपकर, राजेंद्र आमटे आदी सह प्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# प्रा. डॉ. ज्ञानेश्वर घोलप यांना रसायनशास्त्रात पीएचडी प्रदान



बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तळवट बोरगाव येथील रहिवासी व सध्या मुंबई उल्हासनगर येथील सीएचएम महाविद्यालयात सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या प्रा. डॉ. ज्ञानेश्वर घोलप यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने रसायन शास्त्रात पीएचडी पदवी प्रदान केली. प्रा. घोलप यांचे प्राथमिक शिक्षण गावातच झाले, महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी गेवराईच्या आर. बी. अटल महाविद्यालय येथे घेतले. बीडच्या बलभीम महाविद्यालयातून त्यांनी बीएस्सी (रसायनशास्त्र) विषयात पदवी प्राप्त केली. त्यानंतर पदव्युत्तर पदवीचे शिक्षण त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात घेतले. पदव्युत्तर पदवीत त्यांनी रसायनशास्त्रात विद्यापीठात सुवर्णपदक मिळवले होते. त्यानंतर नेट, सेट व गेट या परिक्षाही ते उत्तीर्ण झाले. मुंबईच्या सीएचएम महाविद्यालयात वयाच्या २६ व्या वर्षी सहायक प्राध्यापक म्हणून रुजू झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे रसायनाशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. मच्छिंद्र लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पीएचडीसाठी संशोधन केले. त्यांना नुकीच विद्यापीठाने पीएचडीपदवी प्रदान केली. याबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. मच्छिंद्र लांडे, बलभीम महाविद्यालयातील प्रा. उंदरे सर, आघाव सर, भराटे सर, उक्ल् चे संदीप कोतवाल, प्रशांत थोरात यांच्यासह प्रा. डॉ. घोलप यांचे मित्र, सहकारी, नातेवाईक व कुटुंबिय यांनी कौतुक करत स्वागत केले.

## चौकशीची जाहीर नोटीस

एस. आर. एन. क्रमांक: BED/01091/18/25
फेरफार अहवाल / अर्ज क्रमांक: 312/25
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक न्हावी शेवा मठ विठ्ठल मंदिर बीड बाबत
न्यासाचा पत्ता :- मु. पोस्ट जव्हेरी गल्ली, बीड, ता. जि. बीड, बीड, बीड, बीड

**अर्जदार:- सुनिल बबनराव काळे,**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, बीड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत (वर्णन)**
**अ.क्र., तपशील, अंदाजे मूल्य**
(अ) जंगम मिळकतः- रोख रु. /- मात्र अंदाजे मूल्य (अक्षरी रुपये मात्र फक्त)
**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वे क्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत / कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | AT POST JAVHERI GALLI BEED | 2-16-54 | 86.95 Sm | BEED | 0 | 1500000.00 |

**(ब) स्थावर मिळकत :- रोख रु. १५०००००/- मात्र**
(अक्षरी रुपये पंधरा लाख मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक २३-०७-२०२५ रोजी दिली

शिक्का

(स्वाक्षरीत)
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बीड

---

दैनिक मराठवाडा पत्र — दि. २३/०७/२०२५

**टी.सी. हरवला आहे.**

वसंत मनोहर जाधव या नावाचा बारावी पासचा टी. सी. बीड - गेवराई प्रवासात हरवला आहे. सापडल्यास संपर्क करावा.
**संपर्क : ८७६६९५२५३०**

# चौसाळा महाविध्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी



चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा येथील कला व विज्ञान महाविध्यालयात राष्टीय सेवा योजना यांच्या वतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी महाविध्यालयाचे प्राचार्य डॉ. पी आर. खाकरे यांच्या हस्ते टिळकांच्या प्रतिमेचे पूजन करून आदरांजली वाहण्यात आली. या वेळी कार्यक्रमाधिकारी डॉ. अमर अलदे यांनी टिळकांच्या जीवनावर सविस्तर प्रकाश टाकला या वेळी प्राचार्य डॉ. खाकरे कनिष्ट विभागाचे उपप्राचार्य प्रा. गणपती ढवळशंख , पदव्युत्तर संचालक डॉ. सुधाकर वणवे , डॉ. भिल्लारे . डॉ. साबळे.प्रा. माने, डॉ. कदम., डॉ. मुंडे , डॉ. देशमुख , महाविद्यालयाच्या अधीक्षक सौ. खडके , श्री घोडके , डॉ. साळुंके, डॉ. चाळक यांच्या सह विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

### मा. श्री. एस. एस. घोरपडे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश -१, बीड यांचे न्यायालयात

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. : २३९/२०२५**

अर्जदार- मधुकर पि. वचिष्ट चव्हाण, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. भाटेपुरी, ता. गेवराई, जि. बीड
विरूद्ध
गैरअर्जदार- महाराष्ट्र शासन मार्फत् जिल्हाधिकारी, बीड ता. जि. बीड

**मागणी- अज्ञानाचे नावे असलेली मालमत्ता हस्तांतरण/ विक्री करण्याची परवानगी मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार मधुकर पि. वचिष्ट चव्हाण, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. भाटेपुरी, ता. गेवराई, जि. बीड यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदाराचा अज्ञान मुलगा नामे अभिजीत मधुकर चव्हाण व अभिषेक मधुकर चव्हाण, दोघे रा. भाटेपुरी, ता. गेवराई, जि. बीड अर्जदार यांची वडील असुन अज्ञानांचे पालक म्हणून नेमणुक व अज्ञानाचे नावे असलेली मौजे रंजेगाव येथील गट नं. १५, एकुण क्षेत्र हे. आर २-५४, आकार रू. पै. ०८-४१ अज्ञानाचा हिस्सा अभिजीत व अभिषेक यांचा हिस्सा व स्तःच्या नावे समाईक असलेली ०-१० गुंठे सदर मालमत्ता विक्री करण्यास परवानगी व अज्ञान पालक म्हणून नेमण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

आज दिनांक २३/०७/२०२५ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**प्रकरणातील पुढील तारीख २६/०८/२०२५**
**(मार्फतः वकिल ॲड. एस. एस.उबाळे)**

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
सहा अधिक्षक
जिल्हा न्यायालय, बीड

(स्वाक्षरीत) शिक्का
क.लिपीक

## चौकशीची जाहीर नोटीस

एस. आर. एन. क्रमांक: BED/14596/18/24
फेरफार अहवाल / अर्ज क्रमांक: ____________________

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक १८-०७-२०२५ रोजी दिली
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक सादेक एजुकेशनल चॅरिटेबल ट्रस्ट अंबेजोगाई बाबत
न्यासाचा पत्ता :- सादेक हाउस, करबला बेस रविवार पेठ, अंबेजोगाई, बीड, अंबेजोगाई, अंबेजोगाई

**अर्जदार - सादेक मूणिरोददीन शेख,**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, बीड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत (वर्णन)**
अ.क्र., तपशील, अंदाजे मूल्य
(अ) जंगम मिळकत :- रोख रु. /- मात्र ( अक्षरी रुपये मात्र फक्त)
**स्थावर मिळकत (वर्णन)**
अ.क्र., शहर किंवा गांव , सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र., क्षेत्र, मूल्यांकन, मुदत / कालावधी किंवा स्वरूप, अंदाजे मूल्य
(ब) स्थावर मिळकत: रोख रु. /- मात्र ( अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक १८-०७-२०२५ रोजी दिली.

शिक्का

(स्वाक्षरीत)
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बीड

## चौकशीची जाहीर नोटीस

एस. आर. एन. क्रमांक: BED/12070/18/24
फेरफार अहवाल / अर्ज क्रमांक: ____________________
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री तुळजाभवानी मंदिर सोनाजीनगर सावरगाव बाबत
न्यासाचा पत्ता :- तलजाई निवास, सोनाजी नगर सावरगाव, सोनाजी नगर सावरगाव, बीड, माजलगाव, सावरगाव

**अर्जदार:- विजय मोहनराव जगताप,**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, बीड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

जंगम मिळकत (वर्णन)
**अ.क्र., तपशील, अंदाजे मूल्य**
1. PITALI GHANTA, 3000.00 2.PITALI SAMAI, 2000.00
**(अ) जंगम मिळकत :- रोख रु.५०००/- मात्र ( अक्षरी रुपये पाच हजार मात्र फक्त)**
**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वे क्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत / कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | AT POST SONAJINAGAR SAWARGAON TQ MAJALGAON DIST BE | 36/4 | 0.20 HR | 21780 SFT | TEMPEL LAND | 1150000.00 |
| 2 | AT POST SONAJINAGAR SAWARGAON TQ MAJALGAON DIST BE | 36/4 | 110 X 91 SFT | 10010 | TEMPEL CONSTRACTION | 2950000.00 |

**(ब) स्थावर मिळकत :- रोख रु. ४१०००००/- मात्र**
( अक्षरी रुपये एक्केचाळीस लाख मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक १८-०७-२०२५ रोजी दिली

शिक्का

(स्वाक्षरीत)
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बीड

## जाहीर प्रगटन

### मा.श्री आर. जी. बागडे साहेब, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज ११५९/२०२५**
**दक्षता विरूध्द निरंक**

अर्जदार- १. दक्षता भ्र. श्रीराम मस्के, वय - ५२ वर्षे, धंदा- घरकाम, रा. गवळवाडी, ता. जि. बीड. २. विशाल पि. श्रीराम मस्के, वय-३४ वर्षे, धंदा- नौकरी, रा. गवळवाडी, ता. जि. बीड. ह.मु.भागुजी लहाने नगर, आय. टी. आय. मागे, बीड, ता.जि. बीड. ३. दिपक पि. श्रीराम मस्के, वय - ३० वर्षे, धंदा नौकरी, रा. सदर. ४.. सौ . पुजा भ्र. अक्षय मोकाशी, वय २८ वर्षे, धंदा घरकाम, रा. सासवड ता.पुरंदर जि.पुणे.

विरुध्द निरंक

**मागणी - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत श्रीराम गणपत मस्के मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत श्रीराम गणपत मस्के यांचा मृत्यु दिनांक ०९/०४/२०२५ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत श्रीराम गणपत मस्के यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी यां कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत श्रीराम गणपत मस्के यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २२/०७/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयायचे शिक्क्याने दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ३०/०८/२०२५ आहे.**
**(मार्फत ॲड. सुशील कुमार उबाळे)**

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत) शिक्का
क.लिपीक

## जाहीर प्रगटन

### मा. श्री. व्ही. डी. गिते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज ११०९/२०२५**
**सुनिता भ्र. राजेंद्र आर्सुळ व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- १. सुनिता भ्र. राजेंद्र आर्सुळ, वय ६० वर्षे, धंदा-घरकाम, रा. साक्षाळपिंप्री ता. जि. बीड, २. निकीता उर्फ राणी भ्र. रामचंद्र मराडे, वय-३० वर्षे, धंदा-शेती, रा. घरकाम. रा. पौंडूळ ता. शिरुर (कासार) जि. बीड, ३. दिपाली भ्र. गोविंद गाडे, वय-२८, वर्षे, धंदा-घरकाम, रा. साक्षाळपिंप्री ता. जि. बीड, ४. शुभम पि. राजेंद्र आर्सुळ, वय-२५ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. साक्षाळपिंप्री ता. जि. बीड

(अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

**मागणी अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत राजेंद्र गंगाधर आर्सुळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत राजेंद्र गंगाधर आर्सुळ यांचा मृत्यु दिनांक ०४/१२/२००८ रोजी साक्षाळपिंप्री, ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क ०१ ही मयताची पत्नी असून अर्जदार क २ व ३ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत तसेच अर्जदार क ४ हा मयताचा मुलगा आहे. हे मयताचे कायदेशीर वारस आहे

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत राजेंद्र गंगाधर आर्सुळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १८ जुलै २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिलं.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २९ ऑगस्ट २०२५.**
**(मार्फत- ॲड. एस एल शेळके)**

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत) शिक्का
क.लिपीक

## जाहीर प्रगटन

### मा. श्रीमती ए. बी. निवारे ११ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.

**किरकोळ दिवाणी अर्ज ११३५/२०२५**
**अभिमान वगैरे विरुध्द निरंक**

अर्जदार : १) वीर अभिमान रानुजी, वय ७७, धंदा मजूरी, रा. करचुंडी पो. मांजरसुंबा, ता.जि. बीड, २) वीर भागवत रानुजी, वय ७६, धंदा मजुरी रा. नागोबा गल्ली, पेठ बीड, ता. जि. बीड ३) वीर बळीराम रानुजी, वय ५४, धंदा खा. मजुरी, रा. करचुंडी पो. मांजरसुंबा, ता.जि. बीड

विरुध्द निरंक

**मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत राणू बोलाजी वीर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत राणू बोलाजी वीर यांचा मृत्यु दि. २०/०९/२०२३ रोजी मौजे करचुंडी, पो. मांजरसुंबा, ता. जि. बीड येथे झाला आहे. अर्जदार क. १ ते ३ हे मयताचे मुले आहेत व मयताची पत्नी पुर्वीच मयत झालेली आहे. मयतास वर नमुद अर्जदारांशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत राणू बोलाजी वीर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १७ माहे जुलै २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २५ ऑगस्ट २०२५.**
**(ॲड. एल. आर. गंगावणे)**

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत) शिक्का
क.लिपीक

## जाहीर प्रगटन

### मा. श्री. व्ही. सी. जोशी ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ११७६/२०२५**
**सुखदेव विठ्ठल शेळके व इ वि. निरंक**

ज्यापेक्षा विठ्ठल पि राघु शेळके हे दिनांक १९.०१.२०१४ रोजी सोमनाथवाडी, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार - १. सुखदेव पि. विठ्ठल शेळके, वय-५५ वर्षे. धंदा शेती. रा. सोमनाथवाडी, ता. जि.बीड, २. हरिभाऊ पि. विठ्ठल शेळके, वय-८२ वर्षे, धंदा शेती. रा. सोमनाथवाडी, ता. जि.बीड, ३ पांडुरंग पि. विठ्ठल शेळके, वय-८४ वर्षे धंदा शेती. रा. सोमनाथवाडी, ता. जि. बीड, ४. शहाबाई भ्र. शंकर जाधव, वय-८६ वर्षे, धंदा घरकाम. रा.बेलगाव, ता. जि.बीड, ५. कमल भ्र. छत्रभुज भोसले, वय - ५७ वर्षे धंदा घरकाम. रा. मूळकवाडी, ता. जि.बीड, ६. कोंताबाई भ्र. बप्पसाहेब फरतारे, वय ८० वर्षे, धंदा घरकाम. रा. अंबिकानगर, शाहुनगर, बीड, ता. जि.बीड

अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत नामे विठ्ठल पि राघु शेळके यांची मुले आसून अर्जदार क्र ४ ते ६ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल

तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत विठ्ठल पि राघु शेळके यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख २९/०८/२०२५ आहे.**

आज दिनांक २३ जुलै २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**(ॲड. अंडिल पी. आर. यांच्या मार्फत)**

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत) शिक्का
क.लिपीक

## जाहीर प्रगटन

### मा. श्रीमती एस. डी. सोनी साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज ११४२/२०२५**
**सखाराम बजरंग पवार व इतर २ विरूध्द निरंक**

अर्जदार - १. सखाराम बजरंग पवार, वय ४० वर्षे, धंदा शेती २. तुकाराम पि. सखाराम पवार, वय १६ वर्षे, धंदा शिक्षण, ३. तृप्ती पि. सखाराम पवार, वय १३ वर्षे, धंदा शिक्षण,

अज्ञान अर्जदार क. २ व ३ करीता अ.पा. क. वडील अर्जदार क. १ वरील सर्व राहणार काळेगांव ता. जि. बीड.

विरुध्द निरंक

मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत कुशीवर्ता भ्र. सखाराम पवार यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत कुशीवर्ता भ्र. सखाराम पवार यांचा मृत्यु दिनांक १३/१०/२०२४ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत कुशीवर्ता भ्र. सखाराम पवार यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू **मयत कुशीवर्ता भ्र. सखाराम पवार** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३/०७/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २५/०८/२०२५ आहे.**
**(ॲड. अंडिल पी. आर. यांच्या मार्फत)**

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत) शिक्का
क.लिपीक

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे



# बीड जिल्हाधिकारी दालनात आ.क्षीरसागर यांची बैठक...

### शहर आणि ग्रामीणमधील पाणीपुरवठा, रस्ते, जमीन संपादनाच्या मुद्यांवर सविस्तर चर्चा

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांच्या दालनात बुधवार (दि.२३) रोजु आ. संदीप क्षीरसागर यांनी बीड शहर आणि ग्रामीण भागातील विकासकाम ांबाबत महत्त्वपूर्ण बैठक घेतली. यावेळी अमृत पाणीपुरवठा, रस्ते विकास, जमीन संपादन आणि जलजीवन मिशनच्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा झाली. यावेळी माजी आ.सय्यद सलीम उपस्थित होते.



### ● पुढील मुद्यांवर झाली चर्चा

● बीड शहरातील अमृत पाणीपुरवठा योजनेची कामे कंत्राटदाराच्या ढिसाळ कारभारामुळे रखडली आहेत. यावर उपाय म्हणून मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नगर परिषद आणि कंत्राटदार यांची जिल्हाधिकारी यांच्या दालनात संयुक्त बैठक आयोजित करण्याचे ठरवले.

● छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नगर रोडवरील नवीन सिमेंट रस्ता व दुभाजक झाले आहे. हे दुभाजक होत असताना जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा न्यायालयासमोर वाहनांसाठी रस्ता क्रॉसिंग असणे आवश्यक आहे. याबाबत चर्चा केली.

● राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ एफ वरील खरवंडी ते नवगण राजुरी रस्त्याच्या कामासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित झाल्या; पण अनेकांना अद्यापपर्यंत मावेजा मिळालेला नाही. त्याबाबतीत मुळ दुरूस्ती, सुधारित निवाडा संबंधी वेळोवळी विभागाला मागणी प्रस्तावित केलेली आहे. याबाबतीत जमीन संपादीत होऊनही आतोनात हाल झाले आहेत. यावर आ.क्षीरसागर यांनी सविस्तर चर्चा केली.

● बीड आणि शिरूर तालुक्यात जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेची कामे निकृष्ट आणि अपूर्ण असल्याने ग्रामस्थ त्रस्त आहेत. आ. क्षीरसागर यांनी गावनिहाय तक्रारी मांडल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासन स्तरावर तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.



*बीड: मा.आमदार श्री.सुरेश (अण्णा) धस माजी मंत्री तथा विधानसभा सदस्य आष्टी, पाटोदा व शिरूर कासार यांनी बीड जिल्हा वकील संघास सदिच्छा भेट दिली असता त्यांचा सत्कार करताना बीड जिल्हा वकील संघाचे पदाधिकारी व सदस्य. मा.आमदार श्री. सुरेश आण्णा धस साहेब यांना बीड जिल्हा वकील संघाच्या वतीने बीड जिल्हा न्यायालयाचे समोरील बीड-नगर रोड रस्त्यावरील डिव्हायडर तोडून रस्ता पूर्ववत सुरू करण्यासंदर्भात पत्र दिले.*

## रिपब्लिकन सेना माजलगाव तालुकाध्यक्ष पदी वशिष्ठ लांडगे

**माजलगाव । प्रतिनिधी**

रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वात बीड जिल्ह्यातील दलित बहुजन चळवळीचे धडाडीचे नेते विजय साळवे यांनी रिपब्लिकन सेनेत नुकताच प्रवेश केला असता त्यांची पक्षाच्या जिल्हा अध्यक्ष निवड केली आहे . पक्षश्रेष्ठी आणि पक्ष वाढी साठी साळवे यांनी लागलीच कामाला सुरुवात केली असुन माजलगाव येथील शासकीय विश्रामगृह येथे रविवार दिनांक २० जुलै २०२५ रोजी बैठकीचे आयोजन करण्यात



आले होते प्रसंगी रिपब्लिकन सेना माजलगाव तालुका कार्यकारिणी घोषित करण्यात आली असून तालुका पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या असल्याची माहिती रिपब्लिकन सेनेचे बीड जिल्हा अध्यक्ष विजय साळवे ▶▶ उर्वरित पान २ वर

# निम्मा खरीप हंगाम संपला तरी पीक कर्जवाटपास खाजगी बँकांची टाळाटाळ

### अजितदादांनी हिसका दाखवावा! - सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन: डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात राष्ट्रीयीकृत, खाजगी व सहकारी अशा १९ बँकांच्या २१७ शाखा कार्यरत आहेत. खरीप हंगामासाठी या बँकांना १,४४० कोटी रुपयांचे पीककर्ज उद्दिष्ट दिले गेले आहे. मात्र जुलै अखेर आला तरी केवळ ८१५ कोटी ४५ लाख रुपयांचेच कर्जवाटप झाले असून आतापर्यंत ९५,९५५ शेतकऱ्यांना फक्त ५७



टक्केच कर्ज मिळाले आहे.

मे महिन्यात जिल्ह्यात पावसाचे चांगले आगमन झाले. अधूनमधून झालेल्या पावसामुळे

**शेतकऱ्यांची मागणी: खाजगी बँकांचे पीककर्जाबाबतचे धोरण नकारात्मक आहे. शासनाच्या आदेशांना केराची टोपली दाखविणाऱ्या बँकांवर कारवाई करावी, त्यांना हिसका दाखवावा!**

९९ टक्क्यांहून अधिक पेरणी झाली असली तरी बँकांनी शेतकऱ्यांना पीककर्ज देण्यास आखडत हात घेतला आहे. जिल्ह्यातील दोन बँकांनी अद्याप एकाही शेतकऱ्याला कर्ज दिलेले नाही, तर तीन बँकांनी केवळ २० शेतकऱ्यांपर्यंतच वाटप मर्यादित ठेवले आहे. दोन महिन्यांत उर्वरित ४३ टक्के कर्जवाटप करणे हे बँकांसाठी मोठे आव्हान ठरणार आहे. खाजगी बँकांकडून शासनाच्या आदेशांकडे आणि प्रशासनाच्या सूचनांकडे दुर्लक्ष होत असून, शेतकरी वर्गाची दिशाभूल ▶▶ उर्वरित पान २ वर

## परळी (वैद्यनाथ) येथे श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे विपुल पर्जन्य वृष्टीसाठी श्रावण मासानिमित्त भगवान श्री शिवांची पाठात्मक महारुद्र सेवा सोहळा

**परळी वै. । प्रतिनिधी**

परम पूज्य गुरुमाऊली श्री आण्णासाहेब मोरे प्रमुख, अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा मार्ग दिंडोरी जि. नाशिक, हे अखिल विश्वामधे शांती नांदावी आणि भारतमाता संपन्न होवून, देशवासियांना आरोग्य, ऐश्वर्य, संपन्नता लाभावी तसेच नैसर्गिक आपत्तींपासून सर्वांचे संरक्षण व्हावे यासाठी यासेवा मार्गातून सातत्याने अनेक उपक्रम राबवित असतात. यामधे अध्यात्मिक सेवेच्या माध्यमातून सर्व धर्म समभाव आणि सामाजिक सलोखा रहावा याकरिता सर्व समाजाला एकत्र करुन सर्व धर्मियांसह सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. भारत देशाच्या व सर्व सेवेकऱ्यांच्या उज्वल भविष्यासाठी प.पू.गुरुमाऊलींच्या आशीर्वादाने आज आपल्याला सक्षम व समृद्ध भारत बनवण्यासाठी (दिंडोरी प्रणित) मार्ग गेली कित्येक वर्षापासून अविरत निरंतर १८ विभागातून कार्यकरत आहे. आता विपुल पर्जन्य वृष्टीसाठी श्रावण मासानिमित्त भगवान श्री शिवाची पाठात्मक महारुद्र सेवा सोहळा संपन्न होणार आहे. प.पू. गुरुमाऊलींचे आशिर्वाद आणि आदेशानुसार श्री रुद्र सेवा श्री क्षेत्र वैद्यनाथ परळी येथे श्री प्रभू ▶▶ उर्वरित पान २ वर

# भाजपच्या रक्तदान शिबिरास उस्फुर्त प्रतिसाद! सातशे जणांचा सहभाग!

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पशुसंवर्धन तथा हवामान बदल मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने व जिल्ह्यातील जवळपास सर्व मंडळात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख यांच्या नेतृत्वात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरस जिल्हाभरात मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मि




ळाला असून जिल्हाभरात ७०० रक्तदात्यांनी रक्दान केले बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात लोकांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान केले आहे . राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस यांचा दि.२२ जुलै रोजी वाढदिवस आहे तो संपूर्ण राज्यात उत्साहात साजरा केला जात असून लोकनेत्या मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या दिनांक २६ जुलै रोजी वाढदिवस आहे या दोन्ही ▶▶ उर्वरित पान २ वर

## हज उपरांत कशी जीवन शैली असावी यासाठी मार्गदर्शन

**बीड । प्रतिनिधी**

हज कमिटी व सर्व टुर्स कंपनीकडून यावर्षी ज्या व्य३ती हज यात्रेत जाऊन परत आलेले आहेत अशा सर्व हज यात्रेकरूसाठी हज उपरांत आपली जीवनशैली कशी असावी आचरण कसे असावे याबाबतचे मार्गदर्शन मुफ्ती आरीफ साहेब हे करणार आहेत. हे मार्गदर्शन दि. २७-७-२०२५ रविवार रोजी अमन फं३शन हॉल येथे सकाळी १० वाजल्यापासून दुपारपयरत केले जाणार आहे, तरी सर्व हाजींनी या मार्गदर्शन शिबिरास उपस्थित रहावे, असे आवाहन हज कमिटीचे मोहम्मद जमील जे.के. यांनी केले आहे.

# सुधारित पीक विमा योजनेत ३१ जुलैपर्यंत सहभागी होण्याची मुदत

**बीड । प्रतिनिधी**

विविध नैसर्गिक आपत्तींमुळे पिकाच्या होणाऱ्या नुकसानीपासून शेतकऱ्यास आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून जिल्ह्यातप्रधानमंत्री पीकविमा योजना राबविण्यात येत आहे. खरीप हंगाम पिके ज्वारी, बाजरी, मका, तूर,मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, कापूस व कांदा या अधिसूचित पिकांसाठी, अधिसूचित क्षेत्रातील शेतकऱ्यांना खरी पहंगाम २०२५ साठी सुधारित प्रधानमंत्री पीकविमा योजनेत ३१ जुलै, २०२५ पर्यंत सहभाग घेता येणार आहे, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी एस.एम. साळवे यांनी सांगितले आहे.

प्रधानमंत्री पीकविमा योजना खरीप हंगाम २०२५साठी पिकांसाठी असलेली प्रती हेक्टर विमा संरक्षित रक्कम व शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्त्याची प्रती हेक्टर र क्कम पुढीलप्रमाणे आहे. ज्वारी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर ३३ हजार रूपये असून शेतकऱ्याने प्रती हेक्टर ६६०रूपये भरावयाची आहे. याचप्रमाणे बाजरी पिकासाठी विमासंरक्षि तर क्कम ३० हजाररू. तर शेतकऱ्याने भरावयाची रक्कम ६०० रूपये, भुईमूग विमासंरक्षित रक्कम ४५ हजाररू. व शेतकरी हिस्सा ९०० रूपये, सोयाबीन विम ासंरक्षित रक्कम ५८ हजार रूपये व शेतकरी हिस्सा १ हजार १६० रू., मूगपिकासाठी विमासंरक्षित रक्कम २५ हजार व शेतकरी हिस्सा ५०० रू., उडीद पिकासाठी विमासंरक्षित रक्कम २५ हजार रू. व शेतकरी हिस्सा ५०० रू., तूरपिकासाठी विमासंरक्षित रक्कम ४५ हजार रू. व शेतकरी हिस्सा ९०० रू., कापूस विमासंरक्षित रक्कम ६० हजार रू. शेतकरी हिस्सा १ हजार ८००रू., मका विमासंरक्षित रक्कम३६ हजार रू. व शेतकरी हिस्सा ७२० रू. आणि कांदा पिकासाठी विम ासंरक्षित रक्कम ६८ हजार रू. व शेतकऱ्यांनी भरावयाची रक्कम ३ हजार ४०० रू.याप्रमाणेआहे.

या योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याचा सीळडींरलज्ञ नोंदणी क्रमांक आणि ईपीक पाहणी बंधनकारक आहे. अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित पिके सर्वशेतकरी या योजनेत भाग घेऊ शकतात. कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजनेतील ▶▶ उर्वरित पान २ वर

## महत्वाचे

### परळीत घरफोडी, सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह तीन लाखांचा ऐवज पळविला

**परळी वै. । प्रतिनिधी**

परळी शहरात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होताना दिसून येत आहे. बंद घराच्या दाराचे कडीकोंडा तोडून अज्ञात चोरट्यांनी घरामध्ये प्रवेश करत सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोख र३कम असा दोन ते तीन लाख रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना परळी शहरातील टीपीएस कॉलनी भागात घडली. चोरट्यांनी परवा वकिलाचे घर फोडले. याची फिर्याद काल देण्यात आली. याबाबत अधिक असे की, लातूर जिल्ह्यातील औसा तालु३यातील एकंबी तांडा येथील ॲड. नंदकुमार बळीराम राठोड हे गेल्या काही दिवसांपासून परळीच्या टीपीएस कॉलनी भागात राहतात. २० तारखेला ते घर बंद करून गावाकडे गेले. ते परतले तेव्हा त्यांच्या घराचा कडीकोंडा तुटल्याचे निदर्शनास आले. अज्ञात चोरट्यांनी कडीकोंडा तोडून आतमध्ये प्रवेश केला अणि कपाटाचे लॉकर तोडून आतमधील सोन्याचे गंठन, सोन्याचे मणी, सोन्याचा पत्ता, कानातील सोन्याचे सरपाळे, लहान मुलांच्या कानातील यासह पाचशे रुपयांच्या नोटा, एक मोबाईल असा एकूण दोन ते तीन लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी ॲड. नंदकुमार राठोड यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गु.र.नं. १५४/२५ कलम ३०५, ३३३, ३३१ (४) मा.न्या.सं.२०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### बसची दुचाकीला धडक, दुचाकी स्वार गंभीर

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

कोल्हापूर -माजलगाव बसची धारूर येथील राजमाता जिजाऊ महाविद्यालयाच्या जवळ एका दुचाकीला धडक लागून अपघात झाल्याची घटना मंगळवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास घडली .अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असून ६० प्रवासी असलेली बस खड्ड्यात जाताना थोडक्यात टळली. कोल्हापूर-माजलगाव ही बस खामगाव-पंढरपूर मार्गावरून सायंकाळी सातच्या सुमारास माजलगाव कडे जाताना धारूर येथील राजमाता जिजाऊ महाविद्यालयाच्या जवळ आली असता समोर आलेल्याला दुचाकीला जोरदार धडक लागली .अपघातात दुचाकीस स्वरासह दुचाकी काही अंतरात फरपटत गेली .या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला .दरम्यानबस मध्ये मध्ये ६० च्या जवळपास प्रवासी होते .परंतु चालकाने प्रसगावधान राखत बस खड्ड्यात जाण्यापासून वाचवली. यामुळे मोठा अपघात टाळला.

### गेवराई बसस्थानक परिसरास तळ्याचे स्वरूप

**गेवराई । प्रतिनिधी**

येथील बसस्थानक परिसरातील रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. त्याच प्रमाणे नाल्या देखील तुंबल्या आहेत. यामुळे पावसाचे पाणी रस्त्यावर साचत असल्याने बसस्थानक परिसरास तळ्याचे स्वरूप आले आहे. गेवराई बसस्थानक परिसराकडे राज्यपरिवहन महामंडळ व नगर पालिका प्रशासन दुर्लक्ष करीत असताना दिसुन येत आहे. बसस्थानाकच्या प्रवेशव्दारासमोरील रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. गेवराई येथील बसस्थानकाच्या गेट समोरून मागील दहा पंधरा दिवसांपूर्वी नगर परिषदेच्या वतीने नवीन बसस्थानकाच्या पाठीमागील रहिवाशांना पाण्याची सोय व्हावी म्हणून जेसीबीच्या माध्यमातून पाइपलाइन खोदण्यात आली होती. पाइपलाइन बुजविण्यात आली मात्र रस्ता पुर्ण खराब झाला असून खड्डे पडले आहेत. दरम्यान सोमवारी रात्री झालेल्या पावसाने खड्ड्यात तुडुंब पाणी साचले असल्याने बसस्थानकातुन आत प्रवेश बाहेर प्रवेश करताना बस चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. खड्डे बुजनवण्याची मागणी होत आहे. गेवराई बसस्थानकाच्या समोर अशा प्रकारे पावसाचे पाणी साचत आहे. प्रवाशांची मोठी गैरसोय गेवराई बसस्थानक परिसरात प्रवाशांसाठी लागणाऱ्या सुविधांची वाणवा आहे. यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. राज्य परिवहन विभागाने गेवराई बसस्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या संख्येचा विचार करता सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. बसस्थानकातील उर्वरीत विकास कामे पूर्ण करावीत अशी मागणी प्रवाशी व शहरवासींयाकडून करण्यात येत आहे.

### सौ.के.एस.के.महाविद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती उत्साहात साजरी



**बीड । प्रतिनिधी**

सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनानुसार दिनांक २३ जुलै रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन व त्यांच्या जीवन व कार्याची माहिती विशद करून लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यामध्ये लोकमान्य टिळकांनी न्यु इंग्लिश स्कूल, द डेक्कन एज्युकेशन सोसायटी, फर्ग्युसन महाविद्यालयाची स्थापना केली. ज्या आजही गुणवत्तेसाठी प्रसिध्द आहेत.त्यानंतर लोकमान्य टिळकांनी केसरी हे मराठीतील तर मराठा हे इंग्रजी वृत्तपत्र सुरू करून स्वातंत्र्य आंदोलनाविषयी जनजागृती सुरू केली.त्यांना भारतीय असंतोषाचे जनक म्हणून ओळखले जाते, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे जहालवादी गटाचे अध्यक्ष म्हणून स्वतंत्र आंदोलन तीव्र केले व देशाला स्वराज्य,स्वदेशी,राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार ही चतुसुत्री दिली. स्वराज्य माझा जन्म सिध्द अधिकार आहे आणि तो मी मि ळवणारच ही घोषणा करून १८९३ मध्ये गणेशोत्सवाच्या माध्यमातून स्वातंत्र्य चळवळीकरिता नागरिकांना एकत्रित केले.त्यांची ओरिएन द आर्क्टिटीक होम वेदा आणि गीता रहस्य हे कर्मसिध्दांवरील ग्रंथ प्रसिध्द आहेत. यावेळी संस्थेचे प्रशासकिय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने आणि महाविद्यालयाचे पदव्युत्तर विभाग प्रम ुख डॉ.खान एस, कमवि डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा.जालींदर कोळेकर, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.प्रदिप साळूंके व आभार डॉ.दुष्यंता रामटेके यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.